जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -१२७ दिनांक - २२/०२/२०२५**

गुन्हे शाखा युनिट ६,पुणे शहर

## मकोका व दरोडयाची तयारी या गंभीर गुन्हयातील पाहिजे आरोपीस केले जेरबंद

दि.२२/०२/२०२५ रोजी गुन्हे शाखा युनिट ६ हद्दीमध्ये सहा.पोलीस निरीक्षक मदन कांबळे व स्टाफ कोंबिंग ऑपरेशन करीत असताना **पोलीस अंमलदार कानिफनाथ कारखेले,नितीन मुंढे** यांना माहिती मिळाली की, दिघी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड चे अभिलेखावरील मोक्का व दरोडयाची तयारी या गंभीर गुन्हयांमध्ये पाहिजे असलेले दोन आरोपी स्क्रीन नं.२, वैभव टॉकीज, हडपसर, पुणे येथे छावा चित्रपट पाहण्यासाठी आलेले आहेत.

अशी माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी जावुन १) दिघी पो.स्टे. गु.र.नं. ३५५/२०२४, एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब), (ii), २९ सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधि. नियम १९९९ चे कलम ३(१)(ii),३(४) मधील पाहिजे आरोपी नामे **धर्मेनसिंग ऊर्फ भगतसिंग ऊर्फ धरम्या सुरजितसिंग भादा वय २२ वर्षे, रा. शिव कॉलनी नं. ०४,आदर्श नगर दिघी पुणे व** २)दिघी पो.स्टे.गु.र.नं. ४९३/२०२४ भा.न्या.सं.कलम ३१०(४),भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५,१४२ मधील पाहिजे आरोपी नामे **बादशाहसिंग पोलादसिंग भोंड वय २३ वर्षे, रा.शिव कॉलनी नं. ०४,आदर्श नगर, दिघी, पुणे** यांना ताब्यात घेतले व त्यांचे कडे चौकशी करून नमुद गुन्हयांमध्ये त्यांचा सहभाग निश्चित झाल्याने त्यांना पुढील तपास कामी दिघी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड यांचे ताब्यात दिले.

सदरची कामगीरी मा.अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री राजेंद्र मुळीक, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट -६ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक छगन कापसे, सहा.पोलीस निरीक्षक मदन कांबळे, पोलीस अंमलदार नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले यांनी केली.

